दिव्य मराठी 30-7-2023

...शैक्षणिक धोरणाच्या
...केला गेला आहे..

'पंडित मदनमोहन मालवीय टीचर ट्रेनिंग सेंटर' सारख्या संस्था निर्माण करून शिक्षकांतील कौशल्यांचा विकास करण्याचे धोरणही ठरले आहे. यामुळे अनुभव आधारित शिक्षण, ऑन जॉब ट्रेनिंग, इत्यादीमुळे विद्यार्थ्यांच्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावण्यास मदत होईल.

# नवीन शैक्षणिक धोरणाच्या जागर दिंडीचे मंद्रूपमध्ये स्वागत



सोलापूर. पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूरच्या वतीने नवीन शैक्षणिक धोरण (एनईपी) घरोघरी या अंतर्गत जागर दिंडीचे मंद्रूप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात स्वागत करण्यात आले. दिंडीचे राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जवाहर मोरे व गोपाल जालवादी यांनी हिरवा झेंडा दाखवला. या वेळी महाविद्यालयातील प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते.

# २७५० शाळांचे स्ट्रक्चरल ऑडिट

Scanned with OKEN Scanner

दिव्य मराठी 11-8-2023

# संतोष पाटील महाविद्यालयात क्रांतीदिनी शपथ



सोलापूर | पंचप्रण अभियानांतर्गत मंद्रूप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभाग व अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षाच्या वतीने मेरी माटी मेरा देश अभियानात शपथ घेण्यात आली. रासेयोचे कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जवाहर मोरे यांनी मेरी माटी मेरा देशअंतर्गत शपथ वाचन केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे उपस्थित होते.


दैनिक दिव्य मराठी मध्ये

शोक संदेश व पुण्यस्मरण

आता घरी बसून एका क्लीक किंवा कॉल वर बुक करा

BhaskarAd.com

9772019222

पुढारी दि. 22-8-2023

# शालेय वाटप

सेवा
पानगाव येथील
मंडळ व समस्त
या वतीने पानगाव
ळा व संत तुकाराम
णवंत व गरजू
साहित्यांचे वाटप

ळांतील ९००
गरजू विद्यार्थ्यांना
वे वितरण केले. या
इयत्तेप्रमाणे सॅक,
यासारखे शालेय
वारही शाळांमधील
थम तीन गुणवंत
शिष्यवृत्तीधारक
शेष प्राविण्यासाठी
एकूण ७५ गुणवंत
व उत्कृष्ट शालेय
तुक केले. यासाठी
केश पानसे, राजेश
नसे, सुधीर पानसे,
ऋषीकेश पानसे,
श पानसे, निलेश
नसे, विक्रम पानसे
ते.



मंद्रुप : येथे 'मेरी माटी, मेरा देश' उपक्रमात मान्यवरांसह शिक्षक व विद्यार्थी.

# मंद्रुप महाविद्यालयात विविध कार्यक्रम

**मंद्रुप : पुढारी वृत्तसेवा**

मंद्रुप (ता. दक्षिण सोलापूर) येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने 'मेरी माटी, मेरा देश' या उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रम झाले. यावेळी प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांना रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जवाहर मोरे यांनी 'मेरी माटी, मेरा देश' व पंचप्रण ही संकल्पना स्पष्ट केली.

सर्वांकडून शपथ वदवून घेतली. त्याचबरोबर हर घर तिरंगा या अभियानांतर्गत प्राचार्य, प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी यांनी महाविद्यालय व घरोघरी तिरंगा ध्वज उभारुन सलामी दिली. स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ या संस्थेचे सचिव एम. डी. कमळे यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. विद्यार्थ्यांना खाऊ वाटप करण्यात आला. ग्रामपंचायत मंद्रुप व महाविद्यालय यांच्या सहकार्याने जलशुद्धीकरण केंद्र मंद्रुप येथे वृक्षारोपण करण्यात आले. 'मेरी माटी, मेरा देश' अंतर्गत वसुधा वंदन उपक्रमांतर्गत सर्व विद्यार्थ्यांकडून एक मूठ माती संकलन करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे यांचे प्रोत्साहन मिळाले.

Scanned with OKEN Scanner

दि 8-9-2023 तरुण भारत

हिरासकर, सदस्य निर्मला सुलाखे, शैला सुरेश महिंद्रकर, लीला बासुतकर, नंदा अतुल पूकाळे, बीना विजय नवले व लक्ष्मी तेलकर उपस्थित होते.



# पाटील महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा

**मंद्रुप, दि. ७ सप्टेंबर-**

येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात शिक्षक दिन साजरा करण्यात आला. डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमेचे पूजन मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रमुख पाहुणे म्हणून सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ संस्थेचे विश्वस्त नागेश बिराजदार होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे होते. स्टाफ सचिव प्रा. डॉ. नारायण बनसोडे व सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. डॉ. जवाहर मोरे उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांनी शिक्षकांचा गुलाबपुष्प व पेन देऊन सन्मान केला. समर्थ वाघमारे, सिध्दाराम तरडे, भाग्यश्री व्हनमाने व सानिया पटेल या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. तर प्रा. डॉ. संतोष कदम, प्रा. डॉ. नारायण बनसोडे यांनीही विचार मांडले. नागेश बिराजदार आणि प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे यांनी शुभेच्छा दिल्या. सदफ शेख हिने प्रास्ताविक केले. ऐश्वर्या बिराजदार हिने सूत्रसंचालन केले. लक्ष्मण माने याने आभार मानले.

Scanned with OKEN Scanner

# शारीरिक शिक्षणामधूनच सुदृढ अन् निरोगी पिढी निर्माण होईल

## 'क्रीडा व युवक कल्याण' चे माजी उपसंचालक टेकाळे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी | सोलापूर



मंद्रूप येथे क्रीडा दिनानिमित्त मेजन ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे पूजन करताना श्री. टेकाळे, प्राचार्य डॉ. भाजे, डॉ. तोरवी, डॉ. निंबर्गी व विद्यार्थी.

आयुष्याला सुदृढता मिळते ते शारीरिक शिक्षक. शिक्षण आणि शारीरिक शिक्षण या एकाच नाण्याच्या दोन बाजू आहेत. शिक्षणाइतकेच शारीरिक शिक्षणही आवश्यक आहे. शिक्षण विभाग हा क्रीडा विभागाचा मोठा भाऊ आहे. सुदृढ आणि निरोगी पिढी तयार करावयाच्या असतील तर शारीरिक शिक्षण आवश्यक आहे, असे प्रतिपादन क्रीडा व युवक कल्याण सेवा संचालनालयाचे माजी उपसंचालक जनक टेकाळे यांनी केले. ते मंद्रूप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय क्रीडा दिनानिमित्त आयोजित व्याख्यानप्रसंगी बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे होते. मेजर ध्यानचंद यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करण्यात आले. या वेळी शारीरिक शिक्षण संचालक डॉ. शिवानंद तोरवी, प्रा. डॉ. संगमेश्वर निंबर्गी व्यासपीठावर उपस्थित होते.

या वेळी टेकाळे म्हणाले, मेजर ध्यानचंद यांनी खेळाला उंची मिळवून दिली. त्यांच्यामुळे भारतीय क्रीडा क्षेत्राची जगात ओळख झाली. महाराष्ट्राचे कुस्तीपटू खासाबा जाधव यांनी ऑलिम्पिकमध्ये पदक पटकावले. अभिनव बिंद्रा, गगन नारंग, विजेंद्र सिंग, सुशील कुमार यांनी ऑलिम्पिकमध्ये पदके कमावली. अशा क्रीडापटूंचा सन्मान म्हणून क्रीडा दिन साजरा करावा. नव्या खेळाडूंना उमेद द्यावी.

प्राचार्य डॉ. बी. एम. भांजे म्हणाले, शारीरिक तंदुरुस्तीसाठी कोणत्या ना कोणत्या खेळाची आवड असली पाहिजे. ग्रामीण भागातील मुलांमध्ये क्रीडागुण आहेत. त्यांना वाव दिला पाहिजे. खोमनाळसारख्या ग्रामीण भागातील भाग्यश्री बिले राष्ट्रीय स्तरावर नाव कमावते. यांची प्रेरणा घेऊन मुलांबरोबर मुलींनीही क्रीडा क्षेत्राकडे वळले पाहिजे.

प्रा. डॉ. शिवानंद तोरवी यांनी प्रास्ताविक व पाहुण्यांचा परिचय करून दिला. प्रा. डॉ. जवाहर मोरे यांनी सूत्रसंचालन केले. प्रा. डॉ. संगमेश्वर निंबर्गी यांनी आभार मानले. यावेळी प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

दि. 11-10-2023

दिव्य मराठी

# पथनाट्यामधून महागाई, दुष्काळाची दाहकता मांडली

युवा महोत्सवनगरी | पंढरपूर

युवा महोत्सवाच्या दुसरे दिवशी सामाजिक प्रश्नाने नाट्य गाजले. या पथनाट्यात ३१ महाविद्यालयांनी भाग नोंदवत कचरा-कचरा- शिक्षणाचा कचरा, वेड लागले - मला वेड लागले, यासह शिक्षण, महागाई, भेदभाव, अंधश्रध्दा यांसह सामाजिक प्रश्न घेत दमदारपणे पथनाट्ये सादर केली.

परीक्षकांनी सुनावले खडे बोल.

सकाळपासून सुरू झालेले पथनाट्य दुपारी ४ वाजले तरी सुरू होते. पथनाट्यातून शिक्षण, शेती, दुष्काळ, महागाई अंधश्रद्धा या प्रश्नांना शब्द आणि अभिनयाच्या माध्यमातून वाचा फोडली. अभिनय आणि आवाजाचा सुरेख मेळ घालत विद्यार्थी कलावंतांनी खुल्या मैदानात पथनाट्यातून विषयांची मांडणी केली. आवाज आणि चेहऱ्यावरच्या हावभावातून सादरीकरण उंची गाठत होते. प्रत्येक संघ पथनाट्य सादरीकरण करताना परीक्षकांकडे बघत आवाज वाढवत बोलत आहेत. अशा संघांना परीक्षकांनी खडे बोल सुनावले.



युवा महोत्सवात दुष्काळावर पथनाट्य सादर करताना मंद्रूप येथील संतोष पाटील महाविद्यालयाचा संघ.

# हलगी, पखवाज, संबळ, डफावर धरला ठेका

## लोक वाद्यवृंद स्पर्धेत सहा संघांनी नोंदवला सहभाग

नवनाथ पोरे | युवा महोत्सवनगरी

ताल, लय, ठेका आणि नादाच्या तालावर प्रेक्षकांना डोलायला लावले. भुपाळी ते भैरवी असा लोकवाद्यांचा मेळ रंगला होता. ताल, ठेका आणि लयाला प्रेक्षकांनी भरभरून दाद दिली. यामध्ये तबला, पखवाज, ढोल, ताशे, मृदंगाच्या नादाने वारकरी मंच दणाणून गेला होता. या लोकवाद्य वृंदाला उपस्थित श्रोत्यांनी देखील टाळ्या, शिट्या वाजवत जल्लोष




संगीताने आदी गीते लोकवाद्यवृंदातून साजरी केली.

लोकवाद्य वृंद स्पर्धेत मुख्य कला वारकरी मंच दणाणून गेला होता. बासरी, मृदंग, टाळ, चिपळ्या, ढोलकी, ढोल, एकतारी, तुणतुणे, चौंडके, वीणा, हलगी, डफली, संबळ सनई, चौघडा अशा वाद्यांचा कर्णमधुर आणि ठेका धरायला लावणारा सूर, ताल ऐकून उपस्थित विद्यार्थी विद्यार्थिनी

सादरीकरण करून आपल्यातील लोक संगीताच्या उपजत प्रतिभेचे प्रदर्शन घडवले.

या लोकवाद्य वृंद स्पर्धेत शंकरराव मोहिते पाटील विद्यालय अकलूज, शिवाजी महाविद्यालय बार्शी, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय पंढरपूर, डीएमकेजी मंगळवेढा, संगमेश्वर

Scanned with OKEN Scanner

दि. 2-11-23 सकाळ

पालिस ज्ञानेश्वर उदार, उपनिरीक्षक गजानन पणवाड, अॅड. कलास बडवे, अनिल देशपांडे, प्रवीण शिरशीकर, दिनकर सापनाईकर आदी उपस्थित होते.

## मंद्रूप महाविद्यालयाचा अमृत कलश रवाना

मंद्रूप : मंद्रूप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने 'मेरी माटी मेरा देश' हा उपक्रम यशस्वीरीत्या राबवला. या उपक्रमात शपथ देण्यात आली. त्यानंतर एक मूठभर माती संकलन करून, प्रत्येकाने सेल्फी अपलोड करून ती माती अमृत कलश तयार करून लक्ष्मण माने व सदफ शेख या विद्यार्थ्यांमार्फत दिल्ली येथे झालेल्या सांगता समारंभात सचिव राजेश पांडे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे प्र. प्राचार्य कदम यांचे प्रोत्साहन मिळाले. तर कार्यक्रम अधिकारी डॉ. जवाहर मोरे व डॉ. भगवान आदटराव यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले.

## ...पुरस्कारांचे वितरण

तरुण भारत

2-11-23

...साठ, प्रदेशाध्यक्ष दत्ता कचे यांनी नातेपुते येथील मराठा आरक्षण आंदोलन कर्त्यांना देऊन जाहीर पाठिंबा असल्याचे जाहीर करण्यात आले यावेळी अनेक मराठा आंदोलक कार्यकर्ते उपस्थित होते.



## मंद्रुप महाविद्यालयाचा अमृत कलश दिल्लीला रवाना

**मंद्रुप, दि.१ नोव्हेंबर-**

संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्यावतीने मेरी माटी मेरा देश हा उपक्रम यशस्वीरीत्या राबवला. या उपक्रमात मेरी माटी मेरा देश व पंचप्रण ची शपथ देण्यात आली. त्यानंतर एक मूठभर माती संकलन करून, प्रत्येकाने सेल्फी अपलोड करुन ती माती अमृत कलश तयार करुन लक्ष्मण माने सदफ शेख या विद्यार्थ्यांमार्फत दिल्ली येथे झालेल्या सांगता समारंभात रासेयोचे प्रधान सचिव राजेश पांडे यांच्याकडे सुपूर्द करण्यात आला. महाविद्यालयात वीरोंका नमन, वसुधा वंदन, वक्तृत्व स्पर्धा यासारखेही उपक्रम राबविण्यात आले. यासाठी प्रा.प्राचार्य डॉ एस एन कदम यांचे प्रोत्साहन मिळाले. रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ जवाहर मोरे व प्रा. डॉ भगवान आदटराव यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परिश्रम घेतले तसेच महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, कर्मचारी व स्वयंसेवक यांनी या उपक्रमात यशस्वी सहभाग घेतला.

Scanned with OKEN Scanner

तरुण भारत दि. 4-1-2024

अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.



## संतोष पाटील महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांना अभिवादन

मंद्रूप, दि. ३ जानेवारी -

येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. सौ.कविता सतीश पाटील यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांनी पुष्पार्पण केले. यावेळी युवा उद्योजक सतीश पाटील व कविता पाटील यांनी महाविद्यालयास सदिच्छा भेट दिल्याबद्दल संस्थेच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ संस्थेचे सचिव एम. डी. कमळे, संस्थेचे विश्वस्त नागेश बिराजदार, प्र. प्राचार्य डॉ. संतोष कदम, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. डॉ. जवाहर मोरे यांनी सूत्रसंचालन केले.




दिव्य मराठी दि. 4-1-2024

...त सावित्रीबाईंना अभिवादन करताना चिमुकल्या.

## संतोष पाटील महाविद्यालयात सावित्रीबाई फुलेंना अभिवादन



सोलापूर | मंद्रूप (ता. दक्षिण सोलापूर) येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात सावित्रीबाई फुले यांना जयंतीनिमित्त अभिवादन करण्यात आले. कविता पाटील यांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. यावेळी युवा उद्योजक सतीश पाटील, सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ संस्थेचे सचिव एम. डी. कमळे, संस्थेचे विश्वस्त श्री. नागेश बिराजदार, प्र. प्राचार्य डॉ. संतोष कदम, प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते. प्रा. डॉ. जवाहर मोरे यांनी सूत्रसंचालन केले.

Scanned with OKEN Scanner

# स्वच्छता, आरोग्य, शिक्षणाचा स्वयंसेवकांनी जागर करावा

## संतोष पाटील महाविद्यालयाच्या रासेयो शिबिराचे उद्घाटन

संचार वृत्तसेवा

मंद्रूप,दि.२२- राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी स्वच्छता व आरोग्याबाबत प्रत्येकाच्या घरी जाऊन जागृती केली पाहिजे. स्वयंसेवक मुलींनी ग्रामीण भागातील महिला, मुलींचे प्रश्न समजून घेऊन त्यांच्या शंकांचे निरसन केले पाहिजे. त्या माध्यमातून गावात स्वच्छतेचा जागर करावा. त्यातून गावाचे आरोग्य सुदृढ राहील, असे प्रतिपादन सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ संस्थेचे अध्यक्ष पी. एल. कोळी यांनी केले.



मंद्रूपमधील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयाच्या बसवनगर (तेरामैल) येथील राष्ट्रीय सेवा योजना शिबिराच्या उद्घाटनाप्रसंगी कोळी बोलत होते. प्रारंभी शिबिराचे उद्घाटन उद्योजिका कविता सतीश पाटील व इनरव्हील क्लबच्या चार्टर्ड प्रेसिडेंट अमृता काडादी यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संस्थेचे सचिव एम. डी. कमळे, सरपंच निखिल राठोड, श्रद्धानंद मठाचे भरत महाराज आदींची प्रमुख उपस्थिती होती. शिबिराचे संयोजक प्रा. डॉ. भगवान आदटराव यांनी प्रास्ताविक केले.

यावेळी काडादी म्हणाल्या, मुली महिलांचे प्रश्न चांगल्या पद्धतीने समजून घेऊ शकतात. मुलींनी शिक्षण, आरोग्य व कायद्याचे ज्ञान महिलांना द्यावे. शिक्षणाबाबत त्यांच्यात जागृती केली पाहिजे. भरत महाराज म्हणाले, आयुष्यात ज्या गोष्टी ज्या वेळी करायला पाहिजे त्या वेळीच कराव्यात. तुमचे वय शिक्षण घेण्याचे आहे. चांगले शिक्षण घ्या. आई-वडील, गुरू, वरिष्ठांचा मान ठेवा. मोबाइलमध्ये न गुंतता त्याचा चांगल्यासाठी आणि अभ्यासापुरता वापर करा. त्यातून तुमचे व्यक्तिमत्त्व घडेल. यावेळी माजी सरपंच आनंद पवार, तंटामुक्ती अध्यक्ष धनसिंग पवार, उपाध्यक्ष भुताळसिध्द गिरगाव, ग्रामसेवक राजेभाई चितारी यांच्यासह ग्रामस्थ व स्वयंसेवक उपस्थित होते. सूत्रसंचालन प्रा. बी. एस. कोरे यांनी केले तर रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा. डॉ. जवाहर मोरे यांनी आभार मानले.

## ...हिरात अपलोड

...७० टक्के पदे सध्या भरली जात आहेत. दरम्यान, माध्यमनिहाय शिक्षकांची भरती माध्यम शिक्षक मराठी ३१२, इंग्रजी ९१, कन्नड २५, उर्दू ४० असे एकूण ४६८ शिक्षक जिल्हा परिषदेने मागितले. ९१ इंग्रजी शिक्षक सोलापूर जिल्हा परिषदेच्या जिल्हाभरात १७९ केंद्र शाळा आहेत. त्याअंतर्गत आता प्रत्येक केंद्र शाळेसाठी स्वतंत्र ... शिक्षक द्यावा लागणार...

## उर्दू भाषेचे मोफत वर्ग

दै. तरुण भारत दि. 24/1/2024

परजप, प्रा. जयश्री बिराजदार उपस्थित होते. याप्रसंगी राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाचे अनेक पैलू

घटकांनी त्याचा अंगीकार करावा. स्वतः ला जागतिक बाजारपेठेमध्ये चालू असणाऱ्या

आणि महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वर्ग उपस्थित होते.

पडल्यानंतर फाटलेले कागदी तसेच प्लॅस्टिकचे राष्ट्रध्वज मैदानात, रस्त्यावर तसेच कार्यक्रमाच्या

कार्यालयामध्ये जमा करावेत असे आवाहन प्रांताधिकारी गुरव यांनी केले आहे.

# मंद्रुप महाविदयालय राबविणार पुस्तक भिसी


## प्रजासत्ताक दिनी मान्यवरांच्या उपस्थितीत शुभारंभ

**तभा वृत्तसेवा । अमोगसिध्द मुंजे, मंद्रुप, दि. २४ जानेवारी-**

मजूर , कामगार व नोकरदार कर्मचारी असे अनेक व्यक्ती एकत्र येऊन समूहामध्ये पैशाची अडचण येऊ नये म्हणून भिसी संकल्पना सुरू झाली. ग्रामीण भागात भीसीमुळे खासगी सावकाराच्या कचाटयापासून मुक्त होण्यासाठी भीसीमुळे मदत होते. अकरा व त्यापेक्षा अधिक सदस्य एकत्र येऊन सहकार्यांची पैशाची मदत भागविण्यासाठी भीसीला अच्छे दिन आले. मात्र याच पैशाच्या भीसीला पुस्तकाचे स्वरूप देऊन वाचन संस्कृती व ग्रंथालयास प्रोत्साहन देण्यासाठी मंद्रुप येथील संतोष भीमराव पाटील महाविदयालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. संतोष कदम व त्यांचे सहकारी २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी पुस्तकांची भीसी सूरू करणार आहेत . त्यामुळे ग्रामीण भागात विदयार्थी व प्राध्यापकांमध्ये वाचनसंस्कृती वाढण्यास मदत होणार असल्याने सर्वत्र कौतुक होत आहे .



मंद्रुप येथील संतोष भीमराव पाटील महाविदयालयात २१ प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचार्यांनी एकत्र येऊन पाच वर्षापूर्वी भीसी सुरू केली . यामुळे सदस्यांच्या आर्थिक अडचणी सोडविण्यास मदत होऊ लागली . मात्र तीन महिन्यांपूर्वी महाविदयालयाचे प्राचार्य डॉ. भिमाशंकर भांजे यांचे निधन झाल्यानंतर प्रभारी प्राचार्य म्हणून डॉ. संतोष कदम यांनी पदभार स्वीकारला . पैशाच्या भीसीऐवजी पुस्तकांची भीसी सुरू करण्याची संकल्पना सदस्यांसमोर मांडली . विशेष म्हणजे महाविदयालयाचे संस्थापक कै. कमळे गुरूजी यांच्या विचारांचे प्राध्यापक व कर्मचार्यांनी मनापासून या संकल्पनेला सहकार्य करण्यास सहमती दर्शवली . त्यामुळे प्रभारी प्राचार्य डॉ. संतोष कदम व ग्रंथपाल विनायक गडगी यांना समाधान वाटले.




या संकल्पनेनुसार उपस्थित सदस्यांमधून लकी ड्रॉ पध्दतीने चिठ्ठी काढण्यात येणार आहे. प्रत्येक महिन्यातून एका सदस्याच्या नावे चिठ्ठी काढून विशिष्ट रक्कमेचे व कै. कमळे गुरूजी यांच्या विचारांची पुस्तके देण्यात येणार आहेत . सदस्यांच्या रक्कमेतुन पन्नास टक्के पुस्तक कमळे गुरूजी यांनी स्वीकारलेल्या व सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळाने आचरणात आणलेल्या विचारांची पुस्तके देण्यात येणार आहेत.

तर पन्नास टक्के रक्कम त्या विचारांना अनुसरून असणार्या विचारवंतांची प्रेरणादायी पुस्तके देण्यात येणार आहे . २६ जानेवारी प्रजासत्ताक दिनी महाविदयालयात उपस्थित मान्यवरांच्या हस्ते पुस्तकांच्या भीसी योजनेस सुरूवात करण्यात येणार आहे.

### वाचनसंस्कृती वाढविण्याचा प्रयास

संगणकीय व मोबाईल दुनियेत विदयार्थी व प्राध्यापकांमध्ये वाचन प्रमाण झाली आहे . त्यामुळे प्रेरणादायी व आदर्श विचारवंतांचे विचार समाजात पोहोचण्यास मदत होईल . शिवाय पुस्तकामधील विचार समाजात प्रत्यक्षात आणण्याचा प्रयत्न होईल . यामुळे समाजाच्या विकासात भर पडेल . पुस्तकांच्या भीसी संकल्पनेमुळे प्राध्यापक व विदयार्थ्यांमध्ये वाचन संस्कृती वाढणार आहे

**- डॉ. संतोष कदम**

### प्राध्यापक व कर्मचार्यांची संकल्पना कौतुकास्पद

कै. कमळे गुरूजी यांच्या संस्थेत ज्ञानदान करणारे प्राध्यापक व कर्मचारी कमळे गुरूजींचे विचार समाजात पोहोचविण्यासाठी पुस्तकांची भीसी संकल्पना सुरू केली आहे . यामुळे प्राध्यापक व विदयार्थ्यांमध्ये वाचनप्रमाण वाढणार आहे . संतोष भीमराव पाटील महाविदयालयाच्या प्राध्यापक व कर्मचार्यांचे कौतुकास्पद आहे ..

**- नागेशं बिराजदार**

### प्राध्यापकांकडे ग्रंथालय निर्मिती

महाविदयालयातील आम्ही सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी एकत्र येऊन पुस्तकांची भीसी सुरू करणार आहेत . यामुळे प्राध्यांपकांकडे पुस्तकांचे भांडार निर्माण होऊन ग्रंथालय निर्माण होण्यास मदत होणार आहे. - प्रा. जवाहर मोरे

तरुण भारत दि. 30-1-2024

# सक्षम, निर्णायक व वैचारिक व्हा : योगिनी घारे

तभा वृत्तसेवा,
मंद्रुप, दि.२९ जानेवारी -

राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी व्यक्तीमत्व विकास साधत असताना मनाच्या सौंदर्याकडे लक्ष द्यावे. तरच आपण सक्षम, निर्णायक, हुशार व वैचारिक व्हाल. असे प्रतिपादन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या कुलसचिव योगिनी घारे यांनी केले.

त्या बसवनगर येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना विभाग विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपप्रसंगी बोलत होत्या. अध्यक्षस्थानी सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळाचे उपाध्यक्ष डॉ.सी.जी. हविनाळे हे होते तर प्रमुख उपस्थिती संस्था सचिव



एम डी कमळे, विश्वस्त नागेश बिराजदार, खजिनदार प्रा.व्हि. के.पाटील , सरपंच निखिल राठोड, प्र.प्राचार्य संतोष कदम यांची होती.

पुढे बोलताना योगिनी घारे म्हणाल्या की, पालकांचे तीन प्रकार असून त्यापैकी अधिकारशाही चे पालक अधिक प्रेम व विचार देतात. त्यातूनच वैचारिक पाल्ये घडत असतात.

प्रारंभी कार्यक्रमाचे प्रास्ताविक शिबिर संयोजक प्रा डॉ भगवान आदटराव यांनी केले. यावेळी सिध्दाराम तरडे व कु. सदफ शेख या शिबिरार्थींनी अनुभव कथन केले. अध्यक्षपदावरुन बोलताना डॉ.हविनाळे म्हणाले की, शिबिरात घेतलेले कष्ट व मेहनत यात सातत्य ठेवावे. तसेच व्याख्यानातून मिळालेला बौद्धिक खुराक हा सर्वांगीण विकासासाठी वापरावा. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. मंजुळा खुटाळे हिने केले तर आभार रासेयो कार्यक्रम अधिकारी प्रा डॉ जवाहर मोरे यांनी मानले.

शिबिर यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयाचे प्र प्राचार्य डॉ संतोष कदम, डॉ.शिवानंद तोरवी, डॉ.आर.एम.मोरे., प्रा श्रीमती बी एस कोरे व प्रा डॉ व्हि एन गायकवाड यांनी परिश्रम घेतले शिवाय श्रध्दानंद मठाचे भरत महाराज ,निर्मल पवार, सचिन पवार, सर्व प्राध्यापक, कर्मचारी, ग्रामस्थ व शिबिरार्थी यांचे सहकार्य लाभले.

दिव्यमराठी

# महिलांच्या संरक्षणासाठी कायद्याची कवचकुंडले



## अॅड. किणगी यांचे प्रतिपादन

सोलापूर | गरजू महिलांना शासनाच्या वतीने विधी सेवा प्राधिकरणाच्या माध्यमातून मोफत विधिज्ञ पुरवले जातात. त्यांचे खटले चालवले जातात. मुलींच्या संरक्षणासाठी कायद्याची कवचकुंडले आहेत. आपल्या घरात, समाजात जर महिलांवर अन्याय होत असेल तर आवाज उठवला पाहिजे, असे प्रतिपादन जिल्हा सत्र न्यायालयातील लोक अभिरक्षक अॅड. देवयानी किणगी यांनी केले. त्या मंद्रूपच्या संतोष पाटील महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या बसवनगर येथील शिबिरात महिला सबलीकरण व कायदे या विषयावर बोलताना केले. प्रा. बी. एस. कोरे म्हणाल्या, अंतर्गत तक्रार निवारण समिती प्रत्येक कार्यालयात काम करत असते. नोकरी करत असताना कार्यालयात, शिक्षण घेत असताना महाविद्यालयात जर काय त्रास होत असेल तर त्याला विरोध करता येतो. त्याविरोधात दाद मागता येते. विद्यार्थिनींनी सक्षमपणे विरोध केला पाहिजे. या वेळी प्रा. डॉ. जवाहर मोरे, प्रा. डॉ. ज्योती नादरगी, प्रा. बी. एस. कोरे, प्रा. डॉ. भगवान आदटराव उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

पुढारी मराठी        29-1-2024

अडचणीच ठरत आहे. राज्यभरात सर्वशाळांमध्ये 'मुख्यमंत्री माझी शाळा, ... जाणार आहे. पैशांचाच प्रश्न असल्याने यास शाळांकडून फारसा प्रतिसाद ... आहे. शाळा ... आता सरकारी

# 'नवीन शैक्षणिक धोरणातील लवचिकता विद्यार्थीहिताची'

## संतोष पाटील महाविद्यालयात स्कूल कनेक्ट अभियान

**प्रतिनिधी | सोलापूर**

नवीन शैक्षणिक धोरणात आंतरविद्याशाखीय दृष्टिकोन वाढवला जाणार आहे. या माध्यमातून पदवी विषयाबरोबर छंदही जोपासले जाणार आहेत. नवीन शैक्षणिक धोरणामध्ये लवचिकता आहे, असे प्रतिपादन विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र संकुलाचे संचालक प्रा. डॉ. गौतम कांबळे यांनी केले.

मंद्रूप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात विद्यापीठ व महाविद्यालयाच्या 'एनईपी २०२० स्कूल कनेक्ट' मोहिमेत ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रभारी प्राचार्य डॉ. संतोष कदम होते. या वेळी सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ संस्थेचे विश्वस्त नागेश बिराजदार, आयक्यूएसी समन्वयक प्रा. डॉ. सी. एस. मुलगे आदी उपस्थित होते.

डॉ. कांबळे म्हणाले की, नवीन शैक्षणिक धोरणात विद्यार्थ्यांमधील कला-गुण विकसित करण्यासाठी कौशल्यावर आधारित घटकाला प्राधान्य दिले आहे. शिक्षणाबरोबरच उद्योग वाढीचे कौशल्ये विद्यार्थ्यांना अवगत व्हावी. वाणिज्य शाळेच्या विद्यार्थ्याला बँकेत, विज्ञान शाखेच्या विद्यार्थ्याला इंडस्ट्रीमध्ये दहा ते १२ दिवस काम केले तर दोन श्रेयांक मिळणार आहेत.

दिव्य मराठी 28-2-2024

आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी पारंपारिक वेषात पोवाडे, काव्य सादर केले. मराठी भाषेवरील गौरवास्पद गीते सादर केली. संस्था, संघटनांच्या वतीने मान्यवरांच्या व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले होते. मराठी भाषा दिनानिमित्त स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. त्यातील विजेत्यांचा गौरव करण्यात आला.

# मंद्रूपमध्ये ग्रंथप्रदर्शनात विविध प्रकारचे साहित्य

सोलापूर | मराठी मातृभाषा म्हणून प्रत्येकाला प्रिय आहेच. जीवन व्यवहार सुरळीत होण्यासाठी मराठीचा उपयोग होतो. मराठी भाषा महाराष्ट्रातील प्रत्येकाचा कणा आहे, असे प्रतिपादन प्र. प्राचार्य डॉ. जवाहर मोरे यांनी केले. ते मंद्रूप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात मराठी भाषा गौरव दिनानिमित्त बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रा. डॉ. सी. एस. मुलगे होते. कविश्रेष्ठ कुसुमाग्रजांच्या प्रतिमेचे पूजन झाले. डॉ. मुलगे म्हणाले, प्रत्येकाला भावना अभिव्यक्तीसाठी भाषेची आवश्यकता असते. मातृभाषा मराठीतून विचार व्यक्त करणे सोपे जाते.

ग्रंथप्रदर्शनात विविध ग्रंथ ठेवले होते. विद्यार्थ्यांनी कविता, म्हणी, साहित्यिकांची माहिती असलेले भित्तिपत्रक तयार केले होते. त्याचे अनावरण मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. प्रा. डॉ. संतोष कदम, प्रा. डॉ. एन. डी. बनसोडे आदी उपस्थित होते. सदफ शेख हिने सूत्रसंचालन केले. मंजुळा खुटाळे हिने प्रास्ताविक केले. उमेश तुप्पे याने आभार मानले.



मराठी भाषा दिनानिमीत्त ग्रंथ प्रदर्शन आयोजित केले होते.

वेशात मलांचे नत्य सादरीकरण

शिवदारे महाविद्यालयात

दै. मानदेशी नगारी दि. 13/03/2024

# मंद्रूप महाविद्यालयात महिला दिन उत्साहात साजरा

दक्षिण सोलापूर/प्रतिनिधी : महिलांनी आधुनिक विचारांची कास धरली पाहिजे. पण आधुनिक विचार म्हणजे मॉडर्न कपडे घालणे नव्हे. तर विचाराने आधुनिक होणे अपेक्षित आहे. प्रलोभनांना बळी न पडता वाटचाल करावी. स्वातंत्र्य आणि स्वैराचार यातील पुसटशी रेषा समजून घेतली पाहिजे. प्रत्येकीने आधुनिक विचाराने प्रगती साधली पाहिजे, असे प्रतिपादन सिने-नाट्य अभिनेत्री अश्विनी तडवळकर यांनी केले.


त्या मंद्रूप येथील संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ. जवाहर मोरे होते. यावेळी समन्वयक प्रा. श्रीमती बी. एस. कोरे, प्रा. डॉ. ज्योती नादरगी, प्रा. डॉ. लतिका कट्टिमनी उपस्थित होत्या.

प्र. प्राचार्य डॉ. जवाहर मोरे म्हणाले, प्रत्येकाने महिलांचा सन्मान केला पाहिजे. फक्त महिला दिनापुरता उत्सव करण्यापेक्षा वर्षभर महिलांना मान देऊन सन्मान केल्यास महिलाही प्रगती साधतील. प्रत्येक क्षेत्रात अमीट ठसा उमटवण्यासाठी सक्षमपणे पावले उचलावीत. कष्टातून मार्गक्रमण केल्यास प्रगती साधली जाते. प्रास्ताविक प्रा बी एस कोरे यांनी तर अतिथी परीचय प्रा डॉ ज्योती नादरगी यांनी करुन दिला.कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. सदफ शेख हिने केले. प्रा. डॉ. लतिका कट्टिमनी यांनी आभार मानले. या वेळी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner

दि: 15-3-2024 तरुण भारत

नमुने कसे काढावे याविषयी विद्यार्थ्यांना प्रात्यक्षिक करून दाखवले. सूत्रसंचालन श्रीमती अवनी परमार यांनी केले तर आभार जिल्हा मृद सर्वेक्षण व मृद चाचणी अधिकारी आनंद भोंग यांनी मानले.



## आधुनिक विचाराने प्रत्येकीने प्रगती साधावी : अश्विनी तडवळकर

**मंद्रुप, दि.१४ मार्च-**


महिलांनी आधुनिक विचारांची कास धरली पाहिजे. पण आधुनिक विचार म्हणजे मॉडर्न कपडे घालणे नव्हे. तर विचाराने आधुनिक होणे अपेक्षित आहे. प्रलोभनांना बळी न पडता वाटचाल करावी. स्वातंत्र्य आणि स्वैराचार यातील पुसटशी रेषा समजून घेतली पाहिजे. प्रत्येकीने आधुनिक विचाराने प्रगती साधली पाहिजे, असे प्रतिपादन अश्विनी तडवळकर यांनी केले. मंद्रूप येथील संतोष भीम राव पाटील महाविद्यालयात जागतिक महिला दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात बोलत होत्या. यावेळी सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य डॉ. जवाहर मोरे होते. यावेळी समन्वयक प्रा. श्रीमती बी. एस. कोरे, प्रा. डॉ. ज्योती नादरगी, प्रा. डॉ. लतिका कट्टिमनी उपस्थित होत्या. प्राचार्य डॉ. जवाहर मोरे म्हणाले, प्रत्येकाने महिलांचा सन्मान केला पाहिजे. फक्त महिला दिनापुरता उत्सव करण्यापेक्षा वर्षभर महिलांना मान देऊन सन्मान केल्यास महिलांही प्रगती साधतील. प्रत्येक क्षेत्रात अमीट ठसा उमटवण्यासाठी सक्षमपणे पावले उचलावीत. कष्टातून मार्गक्रमण केल्यास प्रगती साधली जाते. प्रास्ताविक प्रा बी एस कोरे यांनी तर अतिथी परीचय प्रा डॉ ज्योती नादरगी यांनी करून दिला. सूत्रसंचालन सदफ शेख हिने केले. प्रा. डॉ. लतिका कट्टिमनी यांनी आभार मानले.

Scanned with OKEN Scanner

दिव्य मराठी

15-04-2024

# संतोष पाटील कॉलेजात बाबासाहेबांना अभिवादन



प्रतिनिधी | दक्षिण सोलापूर

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे सामाजिक व शैक्षणिक विचार सर्वसामान्य लोकांपर्यंत पोचवण्याची गरज आहे. विद्यार्थ्यांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घेऊन सक्षम पिढी व नागरिक कसे घडतील, याकडे लक्ष देऊन डॉ. आंबेडकरांनी सांगितलेला शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा हा मूलमंत्र अंगिकारला पाहिजे, असे प्रतिपादन सोलापूर जिल्हा समाजसेवा मंडळ या संस्थेचे विश्वस्त नागेश बिराजदार यांनी केले. ते मंद्रूपच्या संतोष भीमराव पाटील महाविद्यालयात डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त प्रतिमापूजन करण्यात आले. या वेळी महाविद्यालयाचे प्रभारी प्राचार्य डॉ. जवाहर मोरे यांनी स्वागत करून प्रास्ताविक केले. या वेळी इतिहास विभागप्रमुख प्रा. एम. पी. कसबे, वाणिज्य विभागाचे प्रा डॉ. व्ही. एन. गायकवाड, प्रा. पी. के. लभाणे आदींसह शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते.

Scanned with OKEN Scanner